**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ३० डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **इस्रो आज रात्री स्पेडेक्स मिशन अंतर्गत अतिशय महत्वाचं प्रक्षेपण करणार.**
2. **देशातल्या परकीय चलन साठ्यात ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ.**
3. **शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार - कृषीमंत्री अॅड.माणिकराव कोकाटे.**
4. **अकोला येथील अॅग्रोटेक - २०२४ राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा समारोप झाला: राज्यातील साडेआठ लाख शेतकऱ्यांनी दिली प्रदर्शनाला भेट.**

-------------------------------

**इस्रो**

**भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इस्रो आज स्पेडेक्स मिशन अंतर्गत अतिशय महत्वाचं प्रक्षेपण करणार आहे. हे प्रक्षेपण करुन अंतराळ क्षेत्रात एक मोठी झेप घेण्यासाठी इस्रो सज्ज झालं आहे. या प्रक्षेपणानंतर असं तंत्रज्ञान असलेला अंतराळ क्षेत्रातला भारत चौथा देश बनणार आहे. अंतराळामध्ये दोन उपग्रहांना किंवा अंतराळ यानांना जोडण्याचं म्हणजेच डॉपिंग करण्याचं तंत्रज्ञान सध्या केवळ अमेरिका, रशिया आणि चीनकडे आहे. श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरुन पीएसएलव्ही सी - 16 या प्रक्षेपकाद्वारे हे प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या वर्षातलं इस्रोचं हे शेवटचं प्रक्षेपण असून, जागतिक अंतराळ समुदायात यामुळ भारताचं स्थान अतिशय बळकट होणार आहे.**

-------------------------------

**परकीय चलन**

**देशातल्या परकीय चलन साठ्यात ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ झाली आहे. त्यामुळे भारत जगात चौथ्या स्थानी पोहचला आहे. २०१४ ते २०२४ या दशकात एकूण थेट परकीय गुंतवणूक अंदाजे सातशे नऊ अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त आहे. जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांकात भारत २०१४ साली ७१व्या स्थानी होता, २०१८ साली भारत ३९ व्या स्थानी पोहचला आहे. लॉजिस्टिक्स, नवोन्मेष, सुरक्षा तसंच सायबर सुरक्षा अशा क्षेत्रांमध्ये देशानं लक्षणीय प्रगती केली आहे. २०१५ ते २०१८ दरम्यान व्यवसाय सुलभता निर्देशांकात ४२ व्या क्रमांकावर झेप घेतली असून भारत गुंतवणुकीसाठी एक प्रमुख केंद्र बनला आहे. २०२४ मध्ये, भारत चीन नंतर जगातला**

दुसऱ्या क्रमांकाचा कच्च्या स्टीलचा उत्पादक देश आहे. मोबाईल फोन उत्पादनातही देशानं दुसरं स्थान मिळवलं आहे. जागतिक शैक्षणिक क्रमवारीत देशानं लक्षणीय प्रगती केली असून या वर्षीच्या क्यूएस जागतिक आशिया विद्यापीठ क्रमवारीत भारताच्या सात संस्थांनी पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवलं आहे.

--------------------------------

आठवले बीड दौरा

संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी  घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसच या प्रकरणाचा तपास जलद गतीन करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी बीडमधील मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्हयाचे विशेष बाब म्हणून पालकमंत्री पद स्वीकारावे, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

--------------------------------

नागपूर पोलीस

नागपुर पोलिसांच्या स्पेशल टीम न तब्बल 66 लाखांची MD पावडर जप्त केली असुन या कारवाहित 5 आरोपींना अटक केली आहे. हे MD पावडर राजस्थान मधून मध्यप्रदेश मार्गे नागपुरात येत होते. याची माहिती पोलिसांच्या स्पेशल क्राईम ब्रांचला होताच पोलिसांनी सापळा रचत ही मोठी कारवाही केली. अशी माहिती नागपूर चे पोलिस आयुक्त डॉ.रवींद्र सिंघल यांनी आज नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

--------------------------------

वाचन कौशल्य कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वाचन कौशल्य कार्यशाळा जमनालाल बजाज प्रशासकीय भवन इथल्या सभागृहात येत्या १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.  ज्ञानस्त्रोत, केंद्र विद्यार्थी विकास विभाग आणि  राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन

संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रम अंतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याबद्दल अधिक माहिती देत आहे आमचे प्रतिनिधी--

*वाचन कौशल्य कार्यशाळेला प्रमुख वक्ते म्हणून दैनिक हितवादचे संपादक विजय फणशीकर उपस्थित राहणार असून, अध्यक्षस्थान प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे भूषविणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी याकरिता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या वतीने कार्यशाळेचे विद्यापीठ युट्युब चॅनेल तसेच फेसबुकवर ऑनलाईन थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. विद्यापीठ स्वायत्त तसेच संलग्न सर्व महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.*

----------------------------------

कृषी मंत्री

कृषी विभागातील केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे कृषीमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. राज्याचे कृषीमंत्री म्हणून पदभार घेताना मंत्रालय इथं ते बोलत होते. कृषी विभागात आवश्यक तिथे सुधारणा करून शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाईल. केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना राज्यात राबवताना अधिक समन्वय साधला जाईल. कृषी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. प्राधान्याने हाती घ्यावयाचे विषय, नवीन धोरणे यांचा अभ्यास करण्यात येईल. शेती आणि शेतकरी यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास असल्याचेही कृषीमंत्री ॲड.कोकाटे म्हणाले. दरम्यान, कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणार नाही आणि कृषी निविष्ठांचा काळाबाजार करणारे दुकानदार आणि अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिला. खते लिकिंग संदर्भात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांकडून तक्रारी येत होत्या. या अनुषंगाने कृषी विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांची एक बैठक कृषिमंत्री कोकाटे यांनी त्यांच्या निवासस्थानी घेतली. दोन दिवसात तक्रारींवर उपाययोजना करा. यापुढे लिकिंग चालणार नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले तर को ऑपरेटिव्ह संस्था, खरेदी-विक्री संघ यांनादेखील माल देण्याची सूचना त्यांनी केली.

----------------------------------

कृषी प्रदर्शन

अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी तीन दिवसीय ॲग्रोटेक -२०२४ राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा काल समारोप झाला. शेवटच्या दिवशी रविवारी रात्री ११

वाजेपर्यंत शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. या प्रदर्शनाला राज्यातील साडेआठ लाख शेतकऱ्यांनी भेट देऊन कृषीचे प्रगत तंत्रज्ञान जाणून घेतले. दरम्यान, या कृषी प्रदर्शनात गडचिरोली येथील कृषी विज्ञान केंद्राने राज्यातून द्‌वितीय क्रमांक पटकावला. अधिक माहिती ऐकुया आमच्या गडचिरोली प्रतिनिधी जयंत निमगडे यांच्या कडून..

*२७ ते २९ डिसेंबर या कालावधीत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यात कृषी विज्ञान केंद्रे दालन गटात गडचिरोलीच्या कृषी विज्ञान केंद्राने द्‌वितीय क्रमांक पटकावला. कुलगुरु डॉ.शरद गडाख, विस्तार संचालक डॉ.धनंजय उंदिरवाडे व डॉ.पंचभाई यांच्या हस्ते गडचिरोलीच्या कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.किशोर झाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पारितोषिक स्वीकारले.*

-----------------------------------

शेगाव

नवीन वर्ष स्वागतासाठी ठिकठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढत आहे. बुलडाणा जिल्ह्यातल्या संतनगरी शेगाव इथं भक्तांची गर्दी लक्षात घेता संत श्री गजानन महाराज संस्थान मधल्या श्रीं चं समाधी स्थळ, आणि मंदिरातले सर्व विभाग भक्तांच्या दर्शनासाठी उद्या ३१ डिसेंबरच्या रात्री खुले राहणार आहेत.

-----------------------------------

हवामान

विदर्भात गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी 16.3 इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. त्या पाठोपाठ भंडारा इथं 17 तर गडचिरोली इथं 17 पूर्णांक दोन आणि नागपूर इथं 17.8 इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण आणि अधून मधून हलक्या पावसांच्या सरी पडल्यान किमान तापमानात वाढ झाली आहे. दरम्यान, ढगाळ वातावरण ओसरताच थंडीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे, आज उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 18 ते 19 अंश सेल्सिअस दरम्यान होतं. यवतमाळ इथं 31.5 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. भारतीय हवामान विभागानं पश्चिम वाऱ्यांच्या प्रभावामुळं एक ते 4 जानेवारीपर्यंत हिमालयाच्या पश्चिम भागात पाऊस आणि हिमवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे.

-----------------------------------

बॉर्डर गावस्कर चषक

बॉर्डर -गावस्कर चषक क्रिकेट स्पर्धेत मेलबर्न कसोटीत ऑस्ट्रेलियानं भारतावर १८४ धावांनी विजय मिळवला. या विजयासह ऑस्ट्रेलियानं मालिकेत दोन - एक अशी

आघाडी घेतली आहे. कसोटी सामन्याच्या आज शेवटच्या दिवशी ३४० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव १५५ धावांवर आटोपला. यशस्वी जयस्वालनं ८४ धावांची खेळी केली, त्याच्या व्यतिरिक्त एकाही फलंदाजाला खेळपट्टीवर टिकाव धरता आला नाही. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार पॅट कमिन्स आणि स्कॉट बोल्डनं प्रत्येकी तीन बळी टिपले. कसोटीत दहा बळी आणि ९० धावा अशी अष्टपैलू कामगिरी करणारा पॅट कमिन्स सामनावीर ठरला. मालिकेतला शेवटचा कसोटी सामना तीन जानेवारीपासून सिडनी इथं होणार आहे.दरम्यान, या विजयासोबतच ऑस्ट्रेलियाच्या संघान कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान निश्चित केलं आहे.

--------------------------------

विषबाधा

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील अडगाव इथं जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील जवळपास २० ते २२ विद्यार्थ्यांना पोषण आहारातून विषबाधा झाल्याची घटना उघडकीस आली. प्राप्त माहितीनुसार, गावातील विद्यार्थी नेहमीप्रमाणे शाळेत गेले असता दररोज देण्यात येणाऱ्या पोषण आहारात विद्यार्थ्यांना खिचडी आणि मोट देण्यात आली. शनिवारी रात्री ११ वाजता २२ विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, पोटदुखी सुरु झाली आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची चमू घटनास्थळी रवाना झाली. या विषबाधा रुग्णांवर औषधोपचार सुरू आहे.

--------------------------------

पत्र खासदार

महाराष्ट्रातील सर्व तहसिल कार्यालयात अनेक बेरोजगारानां अत्यल्प मानधनावर काम कराव लागत असल्यान त्यांना शासनान कंत्राटी सेवेत सामावून किमान वेतन देण्याची मागणी चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेद्र फडणविस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.प्रत्येक तहसिल कार्यालयात सेतुची कामे बेरोजगार तरुण तरुणी मार्फत अत्यल्प मानधनावर केली जात आहे. पंरतु या कर्मचाऱ्याना अत्यल्प मानधन मिळत असल्यान या कर्मचाऱ्यांनी प्रतिभा धानोरकर यांची भेट घेवुन आपल्या मागण्या मांडल्या होत्या.

--------------------------------